ePaper


## शिर्डीसह लोकसभेच्या दोन जागांची आठवलेंची मागणी



| वर्ष - 7 | अंक -32 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- राष्ट्रवादी-काँग्रेसमध्ये कलगीतुरा!
- शिकण्याच्या वयात गुन्हेगारीत एन्ट्री, पोलिसांनी कीटक गँगचा माज उतरवला!
- पिंपरी-चिंचवड भाजपाची संघटनात्मक मोर्चेबांधणी!


www.mahaenews.com | सोमवार, दि. 29 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# बैलगाडा शर्यतीत मुलगा आला आडवा
# घोडीनं उडवलं, पण बैलानं वाचवलं!

## अंगावर शहारे आणणारा पुण्यातला थरारक व्हिडिओ

**| पुणे (खेड) | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**सद्या गावोगावी यात्रांचा हंगाम सुरू आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात येते. त्यातच एक काळजाचा ठोका चुकवणारा व्हिडिओ समोर आला आहे. खेड तालुक्यातील निमगाव खंडोबा घाटात बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. शर्यत पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. पण बैलगाडा धावत असताना मार्गात आलेल्या एका मुलाला एका घोडीने तुडवले, तर बैलाने त्याच्यावरून उडी मारल्याने तो मुलगा थोडक्यात बचावला आहे. या घटनेचा व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**



या व्हिडिओमध्ये अनेक जणांच्या काळजाचा ठोका चुकल्याचं पाहायला मिळाले. मिळालेल्या माहितीनुसार, खेड तालुक्यातील निमगाव खंडोबा घाटात बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. ही शर्यत पाहण्यासाठी पंचक्रोशीतून बैलगाडा शौकीन आले होते. मात्र, बैलगाडा शर्यत सुरू असताना समोरून बैलगाडा येत होता. त्या बैलगाड्यांच्या पुढे एक घोडी देखील होती. त्यात एका घोडीवर एक व्यक्ती देखील बसलेला होता.

आपल्या दिशेने हे घोडे आणि बैलगाडा येताना दिसले तेव्हा सर्वांनी बाजूला पळ काढला. मात्र, एक मुलगा त्या घोडीच्या समोर आल्याने ती घोडी त्या मुलाला धडकली त्यामुळे घोडी आणि घोडीवर बसलेला व्यक्ती आणि तो मुलगा खाली पडला. मात्र, त्या घोडी पाठोपाठ बैलगाडा येत होता. बैला ने त्या मुलाच्या अंगावरून उडी मारून तो पुढे गेला. त्यामुळे त्या मुलाचा जीव थोडक्यात बचावला. या अपघातात मुलगा गंभीर जखमी झाला आहे.

### बैलगाडा शर्यतींच्या राजकीय आयोजनाला आता नियमावलीची वेसण

**राजकीय कार्यक्रम, राजकीय नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त बैलगाडा शर्यत आयोजित करण्यास मज्जाव करण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन केल्यास दंड आणि कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात बैलगाडा शर्यतींच्या आयोजनाला आता नियमांची वेसण घालण्यात आली आहे. राजकीय कार्यक्रम, राजकीय नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त बैलगाडा शर्यत आयोजित करण्यास मज्जाव करण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन केल्यास दंड आणि कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने १८ मे रोजीच्या अंतिम आदेशात नियमांच्या चौकटीत राहून बैलगाडा शर्यतींच्या आयोजनाला परवानगी दिली होती. या निर्णयाचे राजकीय क्षेत्रातून जोरदार स्वागत करण्यात आले होते. बैलगाडा शर्यतींचा मुद्दा राजकीयदृष्ट्या संवेदनशील झाला होता. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटींनुसार आता राज्याच्या पशुसंवर्धन विभागाने बैलगाडा शर्यतींच्या आयोजनाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांच प्रसिद्ध केल्या आहेत. त्यात बैलगाडा शर्यतींबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी काय करावे आणि काय करू नये याबाबतच्या सुस्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.**

# अजितदादा, खडा टाकू नका : भक्कमपणे निवडणुकीला सामोरे जायचे आहे!

## पुण्याच्या जागेवरुन काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अजितदादांना सुनावले

**| पुणे| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**पुणे लोकसभेच्या जागेवरून महाविकास आघाडीत पुन्हा खडाखडी सुरू झाली आहे. राष्ट्रवादीचे नेते तथा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुणे लोकसभेच्या जागेवर दावा सांगितला आहे, त्याला काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी उत्तर दिले आहे. अजितदादांना आमची विनंती आहे की खडा टाकू नका. आपल्याला महाविकास आघाडी म्हणून भक्कमपणे निवडणुकीला सामोरे जायचे आहे, अशा शब्दांत वडेट्टीवार यांनी पवारांचा दावा फेटाळून लावला.**



बापटांच्या निधनानंतर काही दिवसांतच राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप भावी खासदार म्हणून फ्लेक्स लागले होते. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी खुद्द अजित पवार यांनीच पुणे लोकसभा मतदारसंघावर दावा केला आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचा गेल्या काही निवडणुकांत पराभव झाला आहे, त्यामुळे ही जागा राष्ट्रवादीला देण्यात यावी. आमची ताकद काँग्रेसपेक्षा जास्त आहे, त्यामुळे आम्ही ही जागा जिंकू शकतो, असे अजित पवार यांनी म्हटले होते. त्याला काँग्रेसकडून उत्तर देण्यात येत आहे. त्यासंदर्भानेच विजय वडेट्टीवार बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले की, पुण्यातून आमचा लोकसभेचा उमेदवार निवडून आला नाही, असे जर अजित पवार म्हणत असतील तर कसब्याची जागा आम्ही किती वर्षांनी जिंकली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अजितदादांना आमचा आग्रह आणि विनंती आहे की खडा टाकू नका. महाविकास आघाडी म्हणून आपल्या सर्वांना निवडणुकांना भक्कमपणे सामोरे जायचे असेल तर काँग्रेसकडे आहे त्या जागा राहू द्या.

# पुणे लोकसभेच्या जागेवरून राष्ट्रवादी-काँग्रेसमध्ये कलगीतुरा!

## पुणे लोकसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडीत तूतू-मैमै सुरू

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे लोकसभा निवडणुकीवरून राष्ट्रवादी आणि काँग्रेसमध्ये कलगीतुरा रंगल्याचं पाहायला मिळत आहे. गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पुणे लोकसभा मतदार संघावर शनिवारी ( २७ मे ) विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दावा केला. यानंतर काँग्रेस नेते, माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांना उत्तर दिलं होतं. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**





अजित पवार काय म्हणाले?

अजित पवारांनी म्हटलं की, “लोकसभा निवडणुकीला एक वर्ष राहिले आहे. त्यामुळे पुण्यासाठी पोटनिवडणूक लागणार नाही, असे वाटले होतं. मात्र, पोटनिवडणूक लागणार असल्याची माहिती मिळाली आहे. पुण्यात आमची ताकद जास्त असल्याने आम्ही पुण्याची जागा लढविण्यासाठी इच्छुक आहोत.”

“सध्याची परिस्थिती पाहता राष्ट्रवादीची ताकद इतर घटक पक्षांच्या तुलनेत जास्त आहे. महानगरपालिकेत आम्ही आमची ताकद दाखवली आहे. आमचे ४० नगरसेवक होते. आमच्या मित्र पक्षाचे दहा नगरसेवक होते. शहरात राष्ट्रवादीचे दोन आमदार आहेत. ज्या ठिकाणची निवडणूक लागेल त्या ठिकाणी आमच्या घटक पक्षांपैकी कोणाची ताकद जास्त असेल, त्यांना ती जागा मिळावी,” असं मत अजित पवारांनी मांडलं.

**“महाविकास आघाडीत खडा टाकू नये”**

अजित पवारांच्या विधानावर विजय वडेट्टीवार म्हणाले की, “राष्ट्रवादी काँग्रेसने पराभवाचा निकष लावून पुण्यावर दावा सांगणं चुकीचं आहे. अजित पवारांनी महाविकास आघाडीत खडा टाकू नये. आपल्याला बरोबर राहत भक्कमपणे निवडणुकीला सामोरं जायचं आहे.”

**“सगळेच पक्ष दावा करतात, पण...”**

याबद्दल शरद पवार यांना पुण्यात प्रश्न विचारण्यात आला. त्यावर पवारांनी म्हटलं की, “ठिक आहे बघूया... योग्य काय आहे ते बघूया... काँग्रेस, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राष्ट्रवादी आम्ही तिघेही एकत्र बसून यातून मार्ग काढू. यात चिंता करण्याचं कारण नाही.

### अजित पवार यांनी काँग्रेसला पुन्हा डिवचले...

**काँग्रेसने कितीही दावा केला तरी पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचीच ताकद जास्त आहे. गेल्या काही वर्षात काँग्रेसला पुणे लोकसभेची जागा जिंकता आलेली नाही, असे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी पुणे लोकसभेवर दावा केला. मात्र आम्ही कोणीही काही बोलून उपयोग नाही. जागेबाबतचा निर्णय महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेत्यांकडून होईल, असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. पुण्याचे खासदार गिरीश बापट यांच्या निधनामुळे रिक्त जागेवर पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. पोटनिवडणूक होणार की नाही, याबाबत चर्चा सुरू असतानाच अजित पवार यांनी शनिवारी पोटनिवडणूक होईल आणि राष्ट्रवादी काँग्रेसची पुण्यात जास्त ताकद असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच ही जागा लढवेल, असे अजित पवार यांनी जाहीर केले होते. त्यांच्या या विधानानंतर महाविकास आघाडीत वाद निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले असून काँग्रेसच्या स्थानिक तसेच वरिष्ठ नेत्यांनीही पुण्याची जागा काँग्रेसचीच आहे, असे स्पष्ट केले आहे. पुण्यात काँग्रेसची ताकद जास्त असल्याचा दावाही करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी रविवारी पुन्हा एकदा काँग्रेसला डिवचले.**

---

## शिवशाही बस अचानक बंद, प्रवासी हैराण; पण सुप्रिया सुळेंनी एका कृतीतून सगळ्यांचीच मने जिंकली!

। पुणे। महाईन्यूज ।

कडक उन्हात सांगलीकडे निघालेली एक बस रस्त्यात अचानक बंद पडली. एकीकडे रखरखतं ऊन आणि दुसरीकडे रस्त्यावर जवळपास कुठेही एखादं झाडही नसल्याने प्रवाशांची अवस्था बिकट झाली. अशा उन्हाच्या काहिलीत रस्त्यावर उभ्या असलेल्या प्रवाशांच्या मदतीला खासदार सुप्रिया सुळे धावून आल्या. दौऱ्यानिमित्त भोरच्या दिशेने निघालेल्या खासदार सुळे यांनी स्वतःच्या गाडीसह कार्यकर्ते आणि अन्य वाहनांसह मागून आलेल्या एसटी बसमधून सर्व प्रवाशांना खेड-शिवापूर टोल नाका आणि अन्य सावली असलेल्या ठिकाणी पोहोचवले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दुपारी तीन ते साडेतीन वाजताच्या दरम्यान सातारा रस्त्यावर शिंदेवाडी परिसरात पुण्याहून सांगलीकडे निघालेली शिवशाही बस बंद पडली होती. सदर बसमधील सर्व प्रवासी



महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिक सुद्धा उन्हाच्या काहिलीने हैराण होत बसजवळ उभे होते. भोर तालुका दौऱ्यावर निघालेल्या खासदार सुप्रिया सुळे यांचा ताफा त्याठिकाणी पोहोचला, त्यावेळी रस्त्यावर उभ्या प्रवाशांना पाहून सुळे यांनी गाड्या थांबवण्याची सूचना केली आणि स्वतः गाडीतून उतरून प्रवाशांची विचारपूस केली. गाडी बंद पडल्याने ते सर्वजण थांबल्याचे कळताच सुप्रिया सुळे यांनी तातडीने हालचाल करत काही प्रवाशांना स्वतःच्या गाडीत घेतले, काहींना कार्यकर्त्यांच्या गाडीत बसवून घेण्याच्या सूचना दिल्या.

## शिकण्याच्या वयात गुन्हेगारीत एन्ट्री, पोलिसांनी कीटक गँगचा माज उतरवला!

### गुंडाविरोधी पथकाने कारवाई तळेगाव दाभाडे येथून काढली धिंड

।पुणे । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड येथील गुन्हेगारी डोके वर काढत असताना आता पोलिसांनी गुंडांच्या मुसक्या आवळण्यात सुरुवात केली आहे. गोंधळ घालत दहशत निर्माण करणाऱ्या कीटक टोळीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. पिंपरी चिंचवड येथील गुंडाविरोधी पथकाने कारवाई करत त्या गुंडांची तळेगाव दाभाडे येथून धिंड काढली. त्यामुळे गुन्हेगारीचा मावळ पॅटर्न म्हणून जे मावळ बदनाम झालं तिथे पोलिसांनी गुन्हेगारीवर वचक बसवण्यास सुरुवात केली आहे.**

या प्रकरणात पोलिसांनी कीटक उर्फ जय प्रवीण भालेराव (वय १९) वैभव राजाराम विटे (२५, दोघेही रा. तळेगाव दाभाडे) विशाल शिवाजी गुंजाळ (२०, रा. वराळे) प्रदीप वाघमारे (२०, रा. वडगाव) रुतिक मेटकरी (२०, रा. देहूरोड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यासह एका विधिसंघर्षित बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. पीडित महिलेने याप्रकरणी बुधवारी (दि. २४) तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यामुळे तळेगाव दाभाडे येथील गुंडांना चांगलीच चपराक बसल्याचे पहायला मिळत आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, कीटक भालेराव आणि त्याच्या साथीदारांनी तळेगाव दाभाडे येथे भर दिवसा काही मुलींची नावे घेऊन गल्लीत आरडाओरड केला होता. तसेच एका महिलेचा विनयभंग



करत तिला मारहाण देखील केली होती. तसेच संबधित महिलेच्या दिराला कोयत्याचा धाक दाखवून त्याच्याकडून दीड हजार रुपये काढून घेतले. तसेच दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत गुंडा शाखेच्या पोलिसांनी आरोपींचा शोध घेत त्यांना ताब्यात घेऊन अटक केली. त्यांना अटक करून त्यांनी ज्या ठिकाणी दहशत निर्माण केली होती. त्याच ठिकाणाहून त्यांची धिंड काढली. त्यामुळे गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होणार आहे.

या टोळीचा प्रमुख असलेला कीटक भालेराव याच्यावर तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे दहा गुन्हे दाखल आहेत. पोलीस आयुक्त गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. जे गुन्हा करतील त्यांची हयगय करू नका अशा सूचना पोलिसांना दिल्या आहेत. या कारवाईमुळे परिसरातील गुंडगिरी संपण्यास मदत होणार आहे.

# पिंपरी-चिंचवड भाजपाची संघटनात्मक मोर्चेबांधणी!

## विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प; अमोल थोरात यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी।

**आगामी महापालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या शहर कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक चिंचवड येथील ऑटो क्लसरमध्ये झाली. त्या माध्यमातून संघटनात्मक मोर्चेबांधणीवर भर दिला असून, भाजपा प्रणित केंद्र व राज्य सरकारच्या योजना शहरातील तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला आहे, अशी माहिती भाजपा शहर संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी दिली.**






पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारिणीच्या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी खासदार अमर साबळे, जिल्हा प्रभारी वर्षा डहाळे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी उपमहापौर हिरानानी घुले, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार, दक्षिण भारत आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, सरचिटणीस विजय फुगे, राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, महिला मोर्चा शहराध्यक्षा उज्वला गावडे, युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यसमिती सदस्य उपस्थित होते.

माजी खासदार तथा पुणे जिल्हा प्रभारी अमर साबळे म्हणाले की, उज्वला योजना, मुस्लीम विधेयक, आयुष्यमान भारत योजना, देशातील ३६० जिल्ह्यात पाईपद्वारे घरोघरी गॅस वितरण, जम्मू-कश्मिरमधील ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय, एक देश एक निशान संकल्पना यामुळे जगभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा प्रभावशाली नेता अशी झाली आहे. भारताने कोविड महामारीच्या काळात जगभरात लस पाठवली ही अभिमानाची बाब आहे. आगामी काळात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाची ध्येय धोरणे तळागाळपर्यंत पोहोचवावीत.

आमदार उमा खापरे यांनी केंद्र आणि राज्यातील भाजपा प्रणित सरकारच्या धोरणात्मक निर्णयांचा ओहापोह केला. समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे महामार्गावरील मिसिंग लिंक, एसटीमध्ये महिला प्रवाशांना ५० टक्के सूट, जलजीवन मिशन, जलयुक्त शिवार, झोपडीधारकांना अडीच लाखांत घरे देण्याचा निर्णय, शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, १०० रुपयांत आनंदाचा शिधा, पीएमआरडीएची निर्मिती, वारकऱ्यांसाठी सोयीसुविधा अशा निर्णयांचा उल्लेख करीत भाजपाच्या कामगिरीबाबत नागरिकांना विश्वासात घेण्याचे आवाहन केले.

चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार अश्विनी जगताप यांनीही मनोगत व्यक्त केले. आगामी काळात पक्षाची ध्येय धोरणे आणि विकासकामे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी सकारात्मक भूमिकेतून कामाला लागावे, असे आवाहन केले.

दरम्यान, कार्यसमिती दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना समर्पित करण्यात आली. तसेच, आमदार आश्विनी जगताप यांचा पोटनिवडणुकीतील विजयाबाबत, जिल्हा प्रभारीपदी निवड झालेबद्दल वर्षा डहाळे आणि विधान परिषद आमदारपदी नियुक्ती झाल्याबद्दल उमा खापरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. दिवंगत खासदार गिरीश बापट, दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रास्ताविक संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांची केले. सूत्रसंचालन सरचिटणीस राजू दुर्गे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रकाश जवळकर यांनी केले.

### भाजपामुळेच शहराच्या विकासाला चालना : आ.लांडगे

शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला दि. ३० मे रोजी ९ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वात देशभरात 'विशेष जनसंपर्क अभियान' संपन्न होत असून, जिल्हा, मंडळ, शक्तीकेंद्र आणि बूथ पातळीवर विविध कार्यक्रम व उपक्रम होणार आहेत. भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळात शहरातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागले आहेत. शास्तीकर माफी, पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आंद्रा, भामाआसखेड प्रकल्प, कचरा समस्या सोडवण्यासाठी वेस्ट टू एनजी आणि विविध प्रकल्प, मोशी येथील प्रस्तावित मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक तसेच क्रीडा विषयक प्रकल्प साकारात भाजपा सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडचा समतोल विकास केला आहे. समाविष्ट गावांना २० वर्षे विकासापासून वंचित रहावे लागेल. पण, भाजपा काळात या गावांत खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळाली.

### आमदार लांडगे यांच्या अभिनंदनाचा ठराव...

भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा खेळ बैलगाडा शर्यतींचा लढा १२ वर्षांनंतर यशस्वी झाला. सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडा शर्यतींवरील बंदी कायमस्वरुपी उठवली. यासह आंद्रा प्रकल्पातील १०० एमएलडी पाणी शहरात दाखल झाले. त्यापैकी ५० एमएलडी पाणी पुरवठा सुरळीत सुरू झाला. शहराच्या स्थापनेपासून म्हणजे ५० वर्षांत शहरासाठी पहिला जलस्त्रोत निर्माण झाला. आमदार महेश लांडगे आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या सकारात्मक भूमिकेतून भारतीय जनता पार्टीच्या सत्ताकाळात महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले. या अनुशंगाने कार्यसमिती बैठकीत आमदार लांडगे यांच्या अभिनंदनाचा ठराव चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी मांडला. त्याला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

# अंतराळ विज्ञान तरुणांसाठी बनतोय करिअरचा उत्तम पर्याय




भारताचा स्पेस सायन्स प्रोग्राम आता खूप विकसित झाला आहे. त्यामुळेच देशातील तरुण शास्त्रज्ञांसाठी देशासह परदेशातील अवकाश विज्ञानाची दारे खुली झाली आहेत. आज या क्षेत्रात नोकऱ्यांची कमतरता नाही, फक्त ज्ञानाची गरज आहे. त्यामुळे स्पेस सायन्स हा तरुणांसाठी करिअरचा उत्तम पर्याय बनत चालला आहे.

प्रगत तंत्रज्ञानामुळे आज जमिनीपासून आकाशापर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे. त्यामुळे येथील तरुणांसाठी करिअरचे (CAREER IN SPACE SCIENCE) नवे पर्याय खुले होत आहेत. तुम्हालाही अंतराळ विश्वाच्या रहस्यात रस असेल तर तुम्ही स्पेस सॅन्सिसमध्ये करिअर करू शकता. भारताचा स्पेस सायन्स प्रोग्राम (SPACE SCIENCE PROGRAM)आता खूप विकसित झाला आहे. त्यामुळेच देशातील तरुण शास्त्रज्ञांसाठी देशासह परदेशातील अवकाश विज्ञानाची दारे खुली झाली आहेत. आज या क्षेत्रात नोकऱ्यांची कमतरता नाही, फक्त ज्ञानाची गरज आहे.

आता अवकाश विज्ञानाचा विस्तार खूप झाला आहे. या क्षेत्रात येण्यासाठी खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र, पृथ्वी विज्ञान, प्राइमेट ॲटमॉस्फियर आणि एरोनॉमी आणि सौर मंडळाचे अभ्यासक्रम करता येतील. अंतराळ विज्ञान अनेक उपशाखांमध्ये विभागलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने कॉस्मॉलॉजी (COSMOLOGY), प्लॅनेटरी सायन्स (PLANETARY SCIENCE), ॲस्ट्रॉनॉमी (ASTRONOMY), स्टेलर सायन्स (STELLAR SCIENCE), ॲस्ट्रॉलॉजी (ASTROLOGY) इ. या सर्व विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या शाखा आहेत, ज्या अवकाश विज्ञानासाठी उपयुक्त आहेत. यापैकी कोणतीही शाखा



निवडून विद्यार्थी आपले करिअर घडवू शकतात. स्पेस सायन्समध्ये अस्तित्वात असलेल्या विविध करिअरवर एक नजर टाकूया.

### 1) खगोलशास्त्र (ASTROLOGY)

बाह्य अवकाश संशोधन(OUTER SPACE RESEARCH) करणे हे अंतराळ विज्ञानातील खगोलशास्त्राचे कार्य आहे. यामध्ये सूर्यमाला, तारे, आकाशगंगा, ग्रह इत्यादींचा समावेश होतो. ज्यावर ते जमिनीवरून संशोधन करून येथे घडणाऱ्या विविध घटना जाणून घेतात.

### 2) अंतराळवीर (ASTRONAUT)

अंतराळवीरांबद्दल जवळपास सर्वांनाच माहिती आहे, हे असे लोक आहेत जे अंतराळात फिरून आपली स्वप्ने पूर्ण करतात. स्पेस स्टेशनवर राहून संशोधन करणे हे त्यांचे काम आहे. त्यांना अनेक महिने स्पेस स्टेशनमध्ये राहावे लागते.

### 3) स्पेस टेक्नोलॉजी (SPACE TECHNOLOGY)

या क्षेत्रातील अवकाश तंत्रज्ञानाचे करिअरही खूप चांगले मानले जाते. यामध्ये सॅटेलाइट, स्पेस स्टेशन, स्पेसक्राफ्ट, स्पोर्ट्स इन्फ्रास्ट्रक्चर इक्विपमेंट डिझाईन करण्याचे काम केले जाते.

### 4) स्पेस इंजिनीअरिंग (SPACE ENGINEERING)

कोणत्याही अंतराळ मोहिमेशी संबंधित सर्व उपकरणे डिझाइन करणे हे स्पेस इंजिनिअरचे मुख्य काम आहे. तो एरोस्पेस, रोबोटिक्स, मटेरियल सायन्स, कॉम्प्युटर इंजिनीअरिंग तसेच मेकॅनिकल आणि टेलिकॉम इंजिनीअरिंग अशा अनेक क्षेत्रातील इंजिनीअरिंग येथे काम करतात.

### 5) स्पेस रिसर्च (SPACE RESEARCH)

हे खूप विस्तृत क्षेत्र मानले जाते. अवकाश संशोधनात विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असतो. जसे- खगोलभौतिकशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, जैवरसायनशास्त्रज्ञ आणि जैवभौतिकशास्त्रज्ञ, भूगर्भशास्त्रज्ञ आणि खगोलजीवशास्त्रज्ञ. हे सर्वजण आपापल्या वैशिष्ट्यानुसार काम करतात.

### 6) स्पेस लॉ (SPACE LAW)

अंतर्गत क्षेत्राशी संबंधित गतिविधी नियंत्रित करणारा कायदा आहे. यामध्ये देश आणि कंपन्यांमधील करार, संधी, अधिवेशने आणि संघटना यांच्या नियमांची माहिती मिळते. आजच्या काळात अवकाशात ज्याप्रकारे गर्दी वाढत आहे. हे पाहता स्पेस लॉ करिअरचा चांगला पर्याय निर्माण होऊ शकतो.

### 7) स्पेस टुरिझम (SPACE TOURISM)

हे अंतराळ क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. आता यात अनेक नवीन खासगी कंपन्या येत आहेत. तरुणांना करिअर करण्याची उत्तम संधी येथे आहे. आजच्या काळात व्हर्जिन गॅलेक्टिक, ब्लू ओरिजिन, ओरियन, स्पेसएक्स, ओरियन स्पॅन आणि बोईंग यांसारख्या कंपन्या पर्यटन क्षेत्रात कार्यरत आहेत.

## संपादकीय »

### मिक्स अँड मॅच'

***एका विषयात पदवी शिक्षण घेतलेले दुसऱ्याच क्षेत्रात कार्यरत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. जसे की, बीए (इतिहास), कम्प्युटर कोर्स केलेले एखाद्या कंपनीच्या एचआर विभागात कार्यरत आहेत किंवा प्राणीशास्त्रातील बीएससी पदवी आणि एखाद्या कंपनीच्या विपणन विभागात काम करतात.***

सध्या 'मिस अँड मॅच'चा ट्रेंड वाढताना दिसत आहे. पण या सगळ्यात एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे आपले दुर्लक्ष होते आहे, तो म्हणजे नोकरीच्या क्षेत्राशी पूर्णपणे किंवा अंशतः संबंधित कोर्सचा अभ्यास करण्यास काय हरकत आहे? लक्षात घ्या, इथे मी जॉब-ओरिन्टेड कोर्सबाबत बोलत नसून अशा 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्सेसबाबत... केवळ पदवीवर उत्तम नोकरी मिळवण्याचा काळ राहिलेला नाही. लक्षात घ्या, सध्याची वाढती लोकसंख्या बघता आणि स्वतःचे वर्चस्व, अस्तित्व टिकवण्यासाठी बऱ्याच कंपन्यांनी हायर अँड फायर या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. अशा परिस्थितीत एकाच क्षेत्रात पारंगत असलेल्या व्यक्तिपेक्षा बहु-प्रतिभावान व्यक्ती टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे.

**मुंबईमध्ये राबणाऱ्या अनेकांचे हातावर पोट असते. पण मुंबईत राबणाऱ्या अनेकांचे फिरत्या पायांवरही पोट अवलंबून असते. दिवसभर धावपळीची नोकरी, सतत वणवण फिरणे आणि असे भटकतानाच कुठेतरी प्रवासातच डबा खाणे अशी या पोटाची व्याख्या करता येईल. सकाळी घरातून निघताना भरलेला डबा, दुपारी भूक लागल्यावर कुठल्या तरी स्थानकात, बागेत, उद्यानात, मैदानाजवळ बसून खाल्ला जातो.**

## अन्न प्रक्रिया उद्योगात 'टेस्टी' करिअर

आंब्याचा मोसम नसताना अगदी ताजा वाटेल असा आमरस, मटारांचा मोसम नसतानाही उपलब्ध होणारा पिशवीबंद उत्तम मटार, नारळाचं दूध काढण्याच्या त्रासातून सुटका करून देणारं पॅकबंद नारळाचं दूध, अजिबात साफ करण्याची आवश्यकता नसलेले चिकन/ मटण...अशा अनेक पदार्थांनी आता स्वयंपाकघरात महत्त्वाचं स्थान मिळवलंय. आजच्या धावपळीच्या युगात स्वयंपाकासाठी मिळणारा वेळ कमी कमी होत असताना, अशा रेडी टू कूक, रेडी टू इट पदार्थांनी काम खरोखरच सुकर बनत आहे. अशात उपयुक्त अन्नपदार्थाची निर्मिती करणारं शास्त्र म्हणजे फूड टेक्नॉलॉजी!

नाशिवंत अन्नपदार्थ टिकाऊ बनावेत या दृष्टीने त्यावर प्रक्रिया करणं. पण हे करताना अन्नपदार्थांमधली पोषणद्रव्यं, गुणवत्ता, रंग-रूप यांचंही जतन करणं ही तारेवरची कसरत कुशलतेने करणाऱ्या फूड टेक्नॉलॉजिस्टचं व्यवसाय क्षेत्र आज खूपच विस्तारलं आहे. शहरात होणाऱ्या नवनवीन मॉल्समुळे तयार बाजारपेठही निर्माण होत आहे. फक्त शहरातच नाही, तर ग्रामीण भागातही फूड टेक्नॉलॉजी हे महत्वाचं क्षेत्र आहे. शेतात तयार होणाऱ्या फळं, धान्य इत्यादींवर योग्य ती प्रक्रिया करून त्यांचं आर्थिक मूल्य वर्धित करणं हे फूड टेक्नॉलॉजीनेच शक्य आहे. उदाहरणार्थ, स्ट्रॉबेरी नुसतीच विकण्यापेक्षा थोडीशी साखर आणि प्रिझर्व्हेटिव्ह वापरून त्याचा जॅम, क्रश किंवा



सिरप बनविल्यास तिचं आर्थिक मूल्य कितीतरी पटीने वाढतं. आपल्या शेतांमधल्या फळांवर, अन्नधान्यांवर प्रक्रिया करून असं मूल्य वाढविल्यास ग्रामीण आर्थिक व्यवस्थेवरही त्याचा निश्चितच चांगला परिणाम होईल. कृषिमालावर प्रक्रिया करणारा उद्योग हा भविष्यात वेगाने वाढणारा आणि जास्तीत जास्त रोजगार निर्माण करणारा असेल, असे म्हटले जात आहे. त्यामागे ही सगळी पार्श्वभूमी आहे. साहजिकच फूड टेक्नॉलॉजी हा करिअरचा चांगला पर्याय ठरू पाहतो आहे.

फूड टेक्नॉलॉजीचे स्वरूप : या फूड प्रोसेसिंग उद्योगामध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान तसंच अभियांत्रिकी अशा अनेक विद्याशाखांचा समन्वय आवश्यक ठरतो. या उद्योगात उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण (क्वालिटी कंट्रोल) असे दोन विभाग पडतात.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यासाठी धोक्याची घंटा!

## हवामान बदलांचा परिणाम, यंदा पावसाळ्यात संकट वाढण्याची भीती

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हवामान बदल होत आहे. त्याचे परिणाम रोज आपल्यावर होत आहेत. यातील काही परिणाम दृश्य, तर काही अदृश्य आहेत. येणाऱ्या काळात विजा चमकण्याचे प्रकार वातावरण बदलामुळे अधिक वाढू शकतात. हे परिणाम सर्वात जास्त धोकादायक आहेत. हवामान विभागाच्या पुण्यातील हवामान संशोधन आणि सेवा विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी 'मटा कट्टा' या उपक्रमामध्ये विजांपासून निर्माण होणाऱ्या धोक्याबद्दल माहिती दिली.**



हवामान बदल, विजा, रडार, हवामानाचा अंदाज, त्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान अशा विविध विषयांवर त्यांनी यावेळी आपले विचार मांडले.

ग्रामीण भागांमध्ये विजा पडून शेळ्या, मेंढ्या यांचे कळपच्या कळप मृत्युमुखी पडतात, विजा पडून माणसांचे मृत्यू होतात, यासाठी ही वातावरणीय घटना अधिक हानीकारक आहे. यामुळे जीवितहानीसोबत वित्तहानी या दोन्ही परिणामांना सामोरे जावे लागते. पूर्वी पाऊस येण्याआधी आणि पाऊस जाताना विजा चमकायच्या. मात्र, आता पावसाळ्याच्या मध्येही विजा चमकतात. एखाद्या ढगाची त्या ढगाच्या तळापासून वरपर्यंत उंची अधिक असते, तेव्हा त्यामध्ये विजा चमकण्याची शक्यता अधिक असते, असे त्यांनी सांगितले. ढगाची उंची जेव्हा १० ते १२ किलोमीटर असते तेव्हा विजांचे प्रमाण अधिक असते. या विजांचे चार प्रकार असतात. ढगांमध्ये विजा निर्माण होतात, त्या एका ढगातून दुसऱ्या ढगात प्रवाहित होतात, ढगांमधून जमिनीकडे आणि जमिनीकडून ढगांकडे विजा प्रवाहित होतात. यात ढगांमधून जमिनीकडे प्रवाहित होणाऱ्या विजा या अधिक घातक असतात, असे होसाळीकर यांनी स्पष्ट केले. एखाद्या भागात पडणारा पाऊस, स्थानिक भागात काही तास प्रचंड प्रमाणात कोसळणारा पाऊस, यासाठी कारणीभूत असलेले क्युमुलोनिंबस ढग यासंदर्भातही त्यांनी माहिती दिली.

गेल्या काही काळात पाऊस पडण्याच्या प्रमाणात काही बदल झाले आहेत. पावसाच्या आगमनाच्या आणि परतीच्या वेळेतही बदल झाले आहेत. चेरापुंजी, मौसिनराम यांसारख्या सर्वाधिक पावसाच्या ठिकाणी पडणारा पाऊस कमी होत जात असल्याचे दिसत आहे. राजस्थानसारख्या ठिकाणी पूर येत आहेत. किनारपट्टी भागांमध्ये उष्णतेच्या लाटा यापूर्वी कधीही अनुभवल्या नव्हत्या. त्या उष्णतेच्या लाटांचा अनुभव मुंबईसारख्या शहरातही येत आहे. हे वातावरण बदलाचे परिणाम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वातावरण बदलाचा वेग कमी करण्यासाठी कर्ब उत्सर्जन कमी करण्याचा प्रयत्न सध्या सगळे देश करत आहेत. हा वेग थोडा कमी झाला की, अधिक संशोधनासाठी वेळ मिळेल, या काळात तंत्रज्ञानाच्या मदतीने वातावरण बदलावर उपाय शोधण्यासाठीही प्रयत्न होतील. या दृष्टीने हा वेग कमी करण्यासाठी प्रयत्न आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

### वीज पडून 12 जणांचा मृत्यू

**» झारखंडच्या विविध भागांत गेल्या दोन दिवसांत वीज कोसळून १२ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात गेल्या दोन दिवसांपासून वादळी वारे आणि पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले आहेत. झारखंड सरकारने वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला चार लाख रुपयांची भरपाई दिली आहे.**

# वांद्रे-वर्सोवा सागरी मार्गाला स्वातंत्र्यवीर सावरकरांचं नाव देणार!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी घोषणा केली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याचा गौरव म्हणून मुंबईतील वांद्रे - वर्सोवा सागरी मार्गाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू' असे नाव देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. केंद्र सरकारच्या शौर्य पुरस्कारांच्या धर्तीवर अतुलनीय शौर्य गाजविणाऱ्यांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर शौर्य पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत, अशी घोषणाही त्यांनी आज केली.**




स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १४० व्या जयंतीनिमित्त राज्यात 'स्वातंत्र्यवीर गौरव दिन' साजरा केला जात आहे. याचे औचित्य साधून दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात सावरकर यांच्या जीवनावर आधारित 'शतजन्म शोधिताना' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, 'महाराष्ट्र सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती आज प्रथमच साजरी करण्यात आली. त्याचप्रमाणे आज स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती दिनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवीन संसद भवनाचे उद्घाटन केले, ही अभिमानास्पद बाब आहे. त्या ऐतिहासिक सोहळ्याचे व क्षणांचे साक्षीदार होता आले. लोकशाहीच्या पवित्र मंदिराची, नव्या संसद भवनाची वास्तू स्थापना व लोकार्पण विक्रमी वेळेत झाले आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केली होती मागणी



**»मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. ते आपल्या ट्विटमध्ये म्हणतात, 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून, मुंबईतील वांद्रे-वर्सोवा सागरी मार्गाला 'स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू' असे नाव देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी केल्याबद्दल मी त्यांचा नितांत आभारी आहे. १६ मार्च २०२३ रोजी यासंदर्भातील मागणी एका पत्रातून मी केली होती. आपल्या महापुरुषांच्या कार्याचे स्मरण सदोदित नव्या पिढीला होत राहील आणि त्यातून उद्याच्या समर्थ भारतासाठी गौरवशाली पिढ्यांचे निर्माण होईल.'**



# प्रेमासाठी काय पण! कावेरीसाठी राज गुहागरमध्ये..

कलर्स मराठीवरील भाग्य दिले तू मला मालिका आता रंजक वळणावर येऊन पोहचली आहे. कावेरी समोर वैदेहीचा खरा चेहरा आला आणि तिने राज आणि वैदेहीचे लग्न थांबवले. कावेरीचे राजवर प्रेम आहे हे वैदेहीला पहिल्यापासून माहिती असून ती अनभिज्ञ आहे असे दाखविले यामुळे कावेरी दुखावली गेली. तिने सगळ्यांसमोर वैदेहिचा पर्दाफाश केला आणि राजवर तिचे अपर प्रेम आहे अशी कबुली दिली. पण तात्यांनी मात्र याला नकार दिला आहे.. त्यामुळे आता खरी राज आणि कावेरीच्या प्रेमाची परीक्षा सुरू झाली आहे. राज आणि वैदेहीचे लग्न मोडल्यानंतर तात्या कावेरीला तिथून घेऊन गुहागरला निघून गेले. आता राजसमोर खूप मोठे आव्हान आहे जे तात्यांनी त्याला दिले आहे. तात्यांनी राजला चॅलेंज दिले आहे की या गावात राहून दाखव.. कमवून दाखव... तर कावेरीचा हात तुझ्या हातात देईन. ते आव्हान राजने स्वीकारले आहे.

आता मालिकेत मोठा ट्विस्ट येणार आहे. या चॅलेंजमध्ये राज स्वतःला कसं सिध्द करेल ? कसं हे आव्हानं पूर्ण करेल ? हे बघणे उत्सुकतेचे असणार आहे.

आता राज कावेरीसाठी गुहागरमध्ये राहणार आहे. मालिकेमध्ये पुढे राज विटांच्या भट्टीवर राबताना दिसणार आहे. शेतकाम तसेच टेम्पो ड्रायव्हर चे काम करताना दिसणार आहे. तात्यांच्या टपरीवर धुणे भांडी चे काम देखील करताना दिसणार आहे.

अखेर प्रेक्षक जे क्षण बघायला आतुर होते ते मालिकेत बघायला मिळणार आहे. राज कावेरी मध्ये आता प्रेम बहरू लागले आहे... त्यांच्यातील काही रोमँटिक क्षण मालिकेत बघायला मिळणार आहे. तसेच एक सरप्राइज देखील आहे जे लवकरच प्रेक्षकांना कळेल. कावेरीच्या प्रेमापोटी राज हे करण्यास तयार होतो...पण आता त्यांचा लग्नापर्यंतचा प्रवास कसा असेल हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

# आई कुठे काय करते मधला अनिश आहे तरी कोण?



मराठी मालिकांमधील प्रमुख व्यक्तिरेखा साकारणाऱ्या कलाकारांवर प्रेक्षक भरभरून प्रेम करतात. मुख्य भूमिकांसह आता मालिकेतील सहायक भूमिकासुद्धा भाव खाऊन जातात. त्यांनाही प्रेक्षकपसंती मिळतेय. अशीच एक भूमिका म्हणजे 'आई कुठे काय करते' मालिकेतील अनिश ही भूमिका. अभिनेता सुमंत ठाकरे अनिशची भूमिका उत्तमरित्या साकारत असून तो लोकप्रिय होतोय.

अनिश या भूमिकेसाठी मालिकेची टीम अभिनय आणि गायन ही दोन्ही कौशल्य असणाऱ्या कलाकाराच्या शोधात होती. याविषयी अनिश सांगतो, 'गाणं आणि अभिनय या दोन्ही गोष्टी माझ्या अतिशय जवळच्या आहेत. माझं नाव सुचवल्यावर त्यासाठी मी ऑडिशन दिली आणि माझी या भूमिकेसाठी निवड झाली', असं त्यानं सांगितलं. सध्या अनिशच्या भूमिकेला चांगला प्रतिसाद मिळतोय. 'सुरुवातीपासूनच मला सकारात्मक प्रतिक्रिया मिळत आहेत. अनिशसारखा जोडीदार किंवा त्याच्यासारखा मित्र हवा असल्याची इच्छा तरुण मंडळी व्यक्त करतात हेच या भूमिकेचं यश आहे', अशा भावना सुमंतने व्यक्त केल्या.





# सायली संजीवसोबत अफेअरच्या चर्चानंतर या मिस्ट्री गर्लचं नाव चर्चेत

रविवारी सकाळी ऋतुराज गायकवाड संदर्भात एक महत्त्वाचे वृत्त समोर आले की तो विवाहबंधनात अडकणार आहे. यामुळे तो पुढील महिन्यात होणाऱ्या WTC फायनलमध्येही सहभागी होऊ शकत नाही. आयपीएल संघ चेन्नई सुपर किंग्जमध्ये खेळणाऱ्या ऋतुराजने बीसीसीआयला अशी माहिती दिली की, लग्नामुळे तो या काळात उपलब्ध होणार नाही. ३-४ जून रोजी ऋतुराज बोहल्यावर चढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मीडिया रिपोर्टनुसार, तो ऑस्ट्रेलियाविरोधात ७ जून पासून सुरू होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग नसेल. त्यामुळे त्याच्या जागी २१ वर्षीय यशस्वी जैस्वाल इंग्लंडला रवाना होईल, असेही समोर आले आहे. आता ऋतुराजच्या लग्नाचे अपडेट समोर आल्यानंतर तो नेमके कोणाशी लग्न करणार, याही चर्चा सुरू झाल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून त्याचे नाव मराठमोळी अभिनेत्री सायली संजीवसोबत जोडले गेले होते. सायलीच्या इन्स्टाग्राम पोस्टवरही अनेकदा चाहते ऋतुराजबाबत कमेंट करताना दिसतात. सीएसकेचा सामना असला की सायलीच्या कमेंट बॉक्समध्ये ऋतुराजबद्दल असंख्य कमेंट्स आजही येतात.

२०२१ मध्ये सायली आणि ऋतुराजने एकमेकांच्या फोटोंवर केलेल्या कमेंटमुळे त्यांचे नाव एकमेकांसोबत जोडले गेले होते. आजही या रुमर्ड नात्याची चर्चा होते.\मात्र सायली संजीवने अनेकदा सांगितले होते की, त्यांच्यामध्ये केवळ मैत्री आहे.

# गौहर खानने दिली गुड न्यूज.. 39 व्या वर्षी होणार आई..

सध्या बॉलीवूडमध्ये अत्यंत आनंददायी वातावरण आहे. कारण रोज काहीतरी गोड बातमी समोर येत आहे. कुणी प्रेगनन्सीची न्यूज देत आहे तर कुणी मुलगा- मुलगी झाल्याची खबर. काजल अग्रवाल, सोनम कपूर, आलिया भट्ट आणि बिपाशा बासू या सगळ्या अभिनेत्री नुकत्याच आई झाल्याने त्यांच्या मातृत्वची चर्चा आहेच. अशातच बिग बॉस विजेती आणि मॉडेल गौहर खान नेदेखील गोड बातमी दिली आहे. गौहर खानच्या घरी नवा पाहुणा येणार आहे. गौहर खानने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. गौहर खान आणि जैद दरबार 25 डिसेंबर 2020 रोजी विवाह बंधनात अडकले. लॉकडाऊनच्या वेळी गौहर खान आणि जैद दरबारची भेट झाली, त्यानंतर त्यांची मैत्री सुरू



झाली आणि या मैत्रीचे प्रेमात रूपांतर कधी झाले हे कळलेही नाही आणि दोघांनी लग्न केले आणि तब्बल दोन वर्षांनी त्यांनी गुड न्यूज दिली.जैद दरबारचे वडील इस्माईल दरबार हे प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक आहेत. तर आपण गौहर खानने बिग बॉसचा 7 वा सीझनची विजेती होती. गौहर खान सध्या प्रेग्नंट आहे आणि हे सांगण्यासाठी तिने इंस्टाग्रामवर एक अनोखा व्हिडिओ शेअर केला आहे. ज्याद्वारे तिने चाहत्यांना सांगितले की ती आणि तिचा पती जैद दरबार दोनाचे तीन होणार आहेत.

# सर्कस'मधील 'आशिकी' गाण्याला प्रेक्षकांची पसंती;




बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहचा आगामी 'सर्कस' चित्रपट सध्या सर्वत्र चर्चेत आहे. येत्या काही दिवसातच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. मनोरंजनाने परिपूर्ण असलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन केले जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. मागील काही दिवसांपूर्वीच या चित्रपटातील 'करंट लगा रे' आणि 'सुन जरा'ही दोन गाणी प्रदर्शित झाली होती यातील 'करंट लगा रे' गाण्यामध्ये रणवीरसोबत दीपिका देखील होती.

या गाण्याला प्रेक्षकांनी भरपूर प्रेम दिलं. तर 'सुन जरा' गाण्यामध्ये रणवीरची पूजा आणि जॅकलीनसोबची केमिस्ट्री पाहायला मिळाली. दरम्यान, आता या चित्रपटातील तिसरं गाणं प्रदर्शित करण्यात आलं आहे.

'आशिकी'मध्ये रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीनची केमिस्ट्री

नुकत्याच काही वेळापूर्वी सर्कस चित्रपटातील 'आशिकी' गाणं प्रदर्शित करण्यात आलं. अवघ्या काही तासातचं या गाण्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या गाण्यामध्ये रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीन जबरदस्त डान्स करताना दिसत आहेत. शिवाय 'सर्कस'मधील इतर कलाकार देखील दिसत आहेत. काही वेळातच या गाण्याला 3 लाखांपेक्षा जास्त व्ह्यूज मिळाल्या आहेत.'सर्कस'मध्ये दिसणार जुळ्या भावांची गोष्टरोहित शेट्टी दिग्दर्शित सर्कस चित्रपट विल्यम शेक्सपिअरचे नाटक द कॉमेडी ऑफ एरर्स वर आधारित आहे. यामध्ये रणवीर सिंह डबल रोलमध्ये दिसणार आहे. रणवीर व्यतिरिक्त वरुण शर्मा देखील या चित्रपटात डबल रोलमध्ये दिसणार आहे. सर्कस या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती रोहित शेट्टीने केली असून यामध्ये रणवीर सिंह, पूजा हेगडे, जॅकलीन फर्नांडिस, वरुण शर्मा, जॉनी लीवर हे कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसतील.23 डिसेंबर 2022 रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# बेटा यहाँ के हम सिकंदर!

## शुभमन गिलला रोखण्याचा रामबाण उपाय फक्त धोनीकडेच

। अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ चा अंतिम सामना अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स हे दोन्ही संघ यंदाच्या मोसमातील तोडीस तोड संघ आहेत. तयामुळे हा अंतिम सामना रोमांचक होईल, यात काही प्रश्नच नाही. दोन्ही संघातील खेळाडूंवर एकमेकांवर चांगेलच भारी पडणार आहेत. पण गुजरातच्या ताफ्यातील विहडवांसक फलंदाज शुभमन गिल यंदा दमदार फॉर्मात आहे. त्याने आतापर्यन्त आयपीएलमध्ये तीन शतके झळकावली असून त्याला रोखणं, चेन्नईसमोर मोठे आव्हान असेल. गिलला पॅव्हेलियनमध्ये धाडण्यासाठी धोनी कोणती शक्कल लढवणार, जाणून घ्या..**




चेन्नई सुपर किंग्जची सर्वात मोठी ताकद म्हणजे एमएस धोनी, जो पाचव्यांदा चॅम्पियन बनण्याच्या जवळ आला आहे. चेन्नईकडे धोनी आहे, जो कधीही सामना फिरवू शकतो, पण गुजरात टायटन्सकडे शुभमन गिल आहे, जो सध्या चेन्नईसाठी आणि धोनीसाठी सर्वात मोठी डोकेदुखी बनला आहे. रविवारी IPL 2023 च्या अंतिम फेरीत चेन्नई आणि गुजरातचे संघ आमनेसामने असतील तेव्हा सर्वांच्या नजरा गिलवर असतील.

गिल सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने १६ सामन्यांमध्ये ३ शतके आणि ४ अर्धशतकांसह एकूण ८५१ धावा केल्या आहेत. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या क्वालिफायर २ मध्ये गेल्या सामन्यातही त्याने ६० चेंडूत १२९ धावा केल्या होत्या. गिल ही गुजरातची सर्वात मोठी ताकद आहे. अशा स्थितीत चेन्नई त्याला लवकरात लवकर बाद करण्याचा प्रयत्न करेल, पण धोनी गिलला लवकर कसे बाद करू शकतो, त्यावर संजय मांजरेकर यांनी उत्तर दिले.

गिल बॅकफूटवर आत येणारा चेंडू खेळू शकेल, अशी मांजरेकरांना आशा आहे. अशा परिस्थितीत संधी मिळू शकते. त्यांनी महिष तीक्ष्णा हा एक चांगला पर्यायही म्हटले आहे. गिलने तीक्ष्णाचा सरळ चेंडू चुकवला तर चेन्नईला यश मिळू शकते, असे त्यांचे म्हणणे आहे. चहर गिलसाठी अडचणीत निर्माण करू शकतो. चहरने गिलला आयपीएलमध्ये ३ वेळा बाद केले आहे. गिलची त्याच्याविरुद्धची सरासरी २०.६६ आहे. त्यामुळे धोनीच्या ताफ्यात शुभमन गिलसाठी रामबाण उपाय दीपक चहर आहे.

### पॉवरप्लेमध्ये फिरकीपटूंकडून गोलंदाजी

**गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरलेल्या गिलला कसे झटपट बाद करता येईल, हे मांजरेकर यांनी सांगितले. ते म्हणाला की गिलसाठी धोनी दीपक चहर आणि अजून एका फिरकीपटूसोबत जाईल. गुजरातचा सलामीवीर गिलला लवकर बाद करण्यासाठी धोनीने पॉवरप्लेमध्ये दीपक चहर आणि स्पिनरला गोलंदाजी करावी, असे त्यांचे म्हणणे आहे. चहरपासूनच गोलंदाजीला सुरुवात करायला हवी.**

## मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा : प्रणॉयला अजिंक्यपद

### राज्य ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी व्यक्त केली खंत

। क्वालालंपूर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताच्या एच. एस. प्रणॉयने रविवारी तीन गेमपर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात चीनच्या वेंग हाँग येंगला पराभूत करत मलेशिया मास्टर्स (सुपर ३०० दर्जा) बॅडमिंटन स्पर्धेचे जेतेपद पटकावले. प्रणॉयला तब्बल सहा वर्षांच्या कालावधीनंतर एखादी स्पर्धा जिंकण्यात यश आले. प्रणॉयचे ‘बीडब्ल्यूएफ’ जागतिक मालिकेतील स्पर्धेचे हे पहिले जेतेपद ठरले.**




> गेल्या सहा वर्षांत मी अनेक चढ-उतार पाहिले. सहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मला जेतेपद मिळवता येईल याची मी कल्पनाही केली नव्हती. जेतेपद मिळवल्याचा खूप आनंद आहे. सर्व प्रशिक्षकांचे मनापासून आभार. गोपीचंद सरांचे विशेष आभार. त्यांनी मला चांगल्या कामगिरीसाठी सदैव प्रोत्साहन दिले. गेले चार महिने मी कठोर परिश्रम घेतले आहेत. अखेर त्याचे फळ मला मिळाले. चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात विजय मिळवल्याने एक खेळाडू म्हणून आत्मविश्वास दुणावतो. तुमच्या खेळातील अनेक सकारात्मक बाजू समोर येतात. मलेशियामध्येही असेच काही घडले. – एच. एस. प्रणॉय

३० वर्षीय प्रणॉयने ९४ मिनिटे चाललेल्या अंतिम सामन्यात चीनच्या जागतिक क्रमवारीत ३४व्या स्थानी असणाऱ्या वेंगवर २१-१९, १३-२१, २१-१८ असा विजय मिळवला. प्रणॉयने गेल्या वर्षी थॉमस चषकात भारताच्या ऐतिहासिक यशात निर्णायक भूमिका बजावली होती. मात्र, २०१७च्या अमेरिकन खुल्या ग्रां. प्री. गोल्ड स्पर्धेनंतर त्याने कुठलेही जेतेपद मिळवले नव्हते. केरळचा हा खेळाडू गेल्या वर्षी स्विस खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहोचला होता. मात्र, त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. याशिवाय प्रणॉयने मलेशिया आणि इंडोनेशिया (सुपर १००० दर्जा) स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली होती; परंतु तो जेतेपदापासून दूरच राहिला. मलेशिया मास्टर्स स्पर्धेत मात्र त्याने जेतेपद पटकावले.

प्रणॉयला काही वर्षांपूर्वी दुखापतींचा सामना करावा लागला होता. मात्र, २०२१च्या मध्यानंतर त्याची कारकीर्द पुन्हा बहरली आहे. गेल्या दोन वर्षांत भारतीय खेळाडूंमध्ये प्रणॉयच्याच कामगिरीत सातत्य आहे. असे असूनही त्याला ‘बीडब्ल्यूएफ’ जागतिक मालिकेत जेतेपद मिळवता आले नव्हते. रविवारी जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असलेल्या प्रणॉयने चीनच्या २३ वर्षीय वेंगला नमवत विजेतेपद पटकावले. प्रणॉयने स्पर्धेच्या जेतेपदाच्या प्रवासात जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या चाउ टिएन चेन, ऑल इंग्लंड विजेता ली शी फेंग आणि जपानच्या केंटा निशिमोटोला नमवले होते. वेंगने सामन्याची चांगली सुरुवात करताना पहिल्या गेममध्ये ३-१ अशी आघाडी मिळवली होती. प्रणॉयने नंतर ५-५ अशी बरोबरी साधली. मग त्याने ११-१० अशी आघाडीही मिळवली. दोन्ही खेळाडूंमध्ये प्रत्येक गुणासाठी चुरस पाहायला मिळाली. दरम्यान, गेम १६-१६ असा बरोबरीत होता. यानंतर प्रणॉयने गुणांची कमाई करत गेम आपल्या नावे केला. दुसऱ्या गेममध्येही वेंगने प्रणॉयने केलेल्या चुकांचा फायदा घेत ४-० अशी आघाडी घेतली. प्रणॉयने पुनरागमनाचा प्रयत्न केला. मात्र, वेंगने गेमच्या मध्यंतरापर्यंत ११-९ अशी आघाडी मिळवली.

## कनिष्ठ आशिया चषक हॉकी स्पर्धा : भारत-पाकिस्तान सामन्यात बरोबरी



। सालालाह (ओमान) । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कनिष्ठ गटाच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत अखेरपर्यंत चुरशीने खेळला गेलेला भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधील सामना १-१ असा बरोबरीत सुटला. अ-गटात समाविष्ट असलेले हे दोन्ही संघ तीन सामन्यांनंतर अपराजित आहेत.

या सामन्यात शारदानंद तिवारीने २४व्या मिनिटाला भारताला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारतीय खेळाडूंनी नियंत्रित खेळ करत सामन्यावरील पकड निसटू दिली नव्हती. मात्र, ४४व्या मिनिटाला बशरत अलीने पाकिस्तानला बरोबरी साधून दिली. या सामन्यातील बरोबरीनंतर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांचे सात गुण झाले. मात्र, सरस गोलफरकाच्या आधारावर पाकिस्तान अव्वल आणि भारत दुसऱ्या स्थानावर आहे. अन्य एका सामन्यात जपानने तैवानचा १०-१ असा पराभव करून गटात तिसरे स्थान मिळवले. भारतीय खेळाडूंनी सामन्याला आक्रमक सुरुवात केली. चेंडूवर ताबा राखत सातत्याने चाली रचून भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या बचावावरील दडपण वाढवले. सुरुवातीलाच दोन कॉर्नरही भारताने मिळविले. मात्र, त्याचा फायदा भारतीय खेळाडू घेऊ शकले नाहीत. सामन्याच्या मध्यात पाकिस्ताननेही प्रतिआक्रमण करण्यास सुरुवात केली. त्यांनाही निर्माण केलेल्या संधीचा फायदा उठवता आला नाही. भारताचा गोलरक्षक अमनदीपने पाकिस्तानच्या चाली उधळून लावल्या.

पूर्वार्धात सामन्याच्या दुसऱ्या सत्रात शारदानंदने गोलशून्य बरोबरीची कोंडी फोडली. शारदानंदने कॉर्नरवर गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली.